# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र.: २५६/२०१९**

**" ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक २०१९–२०"**

**विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त (पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा आणि विज्ञानेतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास दरवर्षी आलटून–पालटून **" ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक"** प्रदान करण्यात येते. सन २०१८–१९ मध्ये **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त** पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यापीठ विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, **"ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक"** साठी खाली उल्लेख केलेल्या नियम व अटी नुसार विद्यार्थ्यांची माहिती आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **दि. ०६ नोव्हेंबर २०१९** पूर्वी शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**नियम व अटी :**

१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांस हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येईल.

२) विद्यार्थी हा इयत्ता दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर परीक्षेत उत्तम गुणाने उत्तीर्ण झालेला असावा.

३) विद्यार्थी भारतीय संस्कृती, आचार विचार, भारतीय परंपरा मानणारा व त्यांचे स्वत:च्या दैनंदिन जीवनात आचरण करणारा असावा.

४) विद्यार्थ्यांने जास्तीत जास्त प्रकारच्या खेळामध्ये भाग घेतलेला असावा. अशा विद्यार्थ्यांस प्राधान्य देण्यात येईल.

५) गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलांगुणांपैकी जास्तीत जास्त प्रकारामध्ये सहभाग असावा. विद्यार्थी हा होतकरू व हरहुन्नरी व्यक्तिमत्वाचा असावा.

६) रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहीम तसेच आरोग्यविषयक जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.

७) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील पात्र विद्यार्थी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीचा सुवर्णपदकासाठी विचार करण्यात येईल.

८) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीला अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

९) अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारा विद्यार्थी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

गणेशखिंड,पुणे–७ )
संदर्भ:–शै.प्रवेश/३६६१ )
दिनांक:१४/१०/२०१९ )

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग